| MHND240002292020 | नियमित दिवाणी दावा क्र.२०/२०२०<br>रेणूकाबाई बनसोडे व ईतर वि. आनंदा कांबळे व ईतर |
|---|---|

## आदेश निशाणी क्र. १६ खाली

१. अर्जदाराने सदरचा अर्जाव्दारे दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ आदेश २२ नियम ३ अन्वये मयत वादी क्र. १ चे वारस अभिलेखाकवर घेण्यासाठी केला आहे.

२. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार दावा सुरू असताना वादी क्रमांक १ नामे रेणूकाबाई शंकर बनसोडे यांचे दिनांक ३०/०६/२०२० रोजी निधन झाले आहे. त्यांना अर्जदार क्रमांक १ नामे लक्ष्मण पि. शंकर बनसोडे व अर्जदार क्र. २ दिलीप पि. शंकर बनसोडे तसेच गैरअर्जदार क्र. ३ नामे संगिता उर्फ आरती भ्र. विलास सोनुले हे वारस आहेत. अर्जदार क्र. १ व २ ही वादीची मुले आहेत व निशाणी क्र. १६ मधील गैरअर्जदार ही वादीची मुलगी आहे. वादीच्या मृत्युनंतर दाव्याचे कारण उरते आहे. म्हणून अर्जदारांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. म्हणून सदरचा अर्ज केला आहे. दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकले.

३. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार अर्ज मुदतीत नसल्यामुळे वादी क्र. १ च्या वारसांना दाव्यात सामील करता येणार नाही.त्यामुळे फेटाळण्यात यावा.

४. प्रस्तुतचा दावा जमीनची वाटणी होवुन प्रत्येक वादीस १/६ हिस्याची मालकी देवुन वेगळा ताबा देण्यात यावा तसेच कायम मनाई हुकूमाने प्रतिवादीस वादग्रस्त जमीन गट क्र. १९८ क्षेत्र ०७ हेक्टर १९ आर, गट क्र. २१३ क्षेत्रफळ ०० हेक्टर ४१ आर हया जमीनी कोणाशी हस्तातरीत करू नये यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आला आहे. अर्जदारांच्या म्हणण्यानुसार वादी क्र. १ यांचे मृत्युनंतर दाव्याचे कारण उरते आहे. वादी क्र. १ यांचा मृत्यू दि. ३०.०६.२०२० रोजी झाला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार मृत्यू दिनांका पासुन अर्जदार क्र. १ व २ यांनी ९० (नव्वद) दिवसात अर्ज केला आहे. त्यामुळे अर्ज मुदतीत असल्याचा युक्तीवाद वादीचे विद्वान विधिज्ञ श्री. के. आर. पाटील

यांनी असा युक्तीवाद केला. त्यामुळे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने दावा दुरूस्ती करणे आवश्यक आहे. न्यायाच्या दृष्टीने अर्जात नमुद कारण लक्षात घेता वारस अभिलेखावर घेणे न्यायहितीच्या दृष्टीने आवश्यक आहे. अर्जदार क्र. १ व २ व नि. क्र. १६ खालील गैरअर्जदार संगीता उर्फ आरती भ्र. विलास सोनुले वादीची मुलगी यांना प्रतिवादी क्र. ४ म्हणुन सामील करण्याकरीता त्याअनुषंगाने दावा दुरूस्ती करणे आवश्यक आहे. म्हणून मी न्यायहिताच्या दृष्टीने खालील आदेश पारित करीत आहे.

**—:आदेश:—**

| | |
|---|---|
| **१.** | अर्ज निशाणी क्र. १६ मंजुर करण्यात आला. |
| **२.** | वादी क्र. १ नामे रेणुकाबाई भ्र. शंकर बनसोडे यांचे वारसांना अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते. |
| **३.** | वादीने वादपत्रात यथायोग्य दुरूस्तीकरून दुरूस्त वादपत्र दाखल करावे. |

(जी.आर.डोरनलपल्ले)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नायगाव बा.

दिनांक :—०९/०२/२०२१

| | |
|---|---|
| MHND240002292020 | **नियमित दिवाणी दावा क्र.२०/२०२०**<br>**रेणूकाबाई बनसोडे व ईतर वि. आनंदा कांबळे व ईतर** |

## प्रमाणपत्र

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | ऐ.यु. करे |
| न्यायालयाचे नाव | : | २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर नायगाव बा. |
| दिनांक | : | ०९/०२/२०२१ |
| पिठासीन अधिका—यांनी न्यायनिर्णयावर केलेली स्वाक्षरी | : | ०९/०२/२०२१ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख | : | ०९/०२/२०२१ |
| न्यायालयाचे नाव | : | २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर नायगाव बा. |